# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date: 06 October 2023
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक : ०६ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.**

****

भारतीय रिझर्व बँकेनं आज द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. यामध्ये रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. मुंबईत झालेल्या बँकेच्या पतधोरण समितीच्या द्वैमासिक आढावा बैठकीनंतर, गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ही माहिती दिली. सलग चौथ्यांदा रेपो दरात कोणताही बदल करण्यात आला नाही. भारत जगाच्या विकासाचं केंद्र बनत असल्याचं दास यांनी यावेळी सांगितलं. या बैठकीत रेपो दर, जीडीपी वाढ, महागाई आणि इतर आर्थिक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आल्याचं ते म्हणाले. देशाचा आर्थिक विकास दर सहा पूर्णांक पाच टक्के राहण्याचा अंदाज आहे, तसंच आता महागाई दर नियंत्रणात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाच्या आर्थिक वर्षात महागाई दर पाच पूर्णांक चार टक्के राहण्याचा अंदाज दास यांनी व्यक्त केला आहे.

****

मुंबईत गोरेगाव इथं इमारतीत लागलेल्या आगीत सात जणांचा होरपळून मृत्यू झाल्याप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत, पंतप्रधान राष्ट्रीत मदत निधीतून दिली जाणार असल्याचं, त्यांनी जाहीर केलं आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. आज नवी दिल्ली इथं माध्यम प्रतिनिधींशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, या घटनेत मृत्यूमुखी झालेल्यांच्या कुटुंबियांना, प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. दुर्घटनेतल्या जखमींचा खर्च राज्य सरकार करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

या घटनेत ५८ जण जखमी झाले आहेत, तर पाच जणांची प्रकृती चिंताजनक आहे. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नक्षलविरोधी कारवायांसंदर्भात आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत महत्वपूर्ण बैठक सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला उपस्थित आहेत.

****

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या मृत्यू प्रकरणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. कोरोना काळात महाविकास आघाडीच्या याच आरोग्य यंत्रणेनं सक्षम काम केलं होतं, आपल्या सरकारनंतर राज्याची दूर्दशा झाल्याचं ठाकरे म्हणाले. औषधांचा पुरवठा होत नाही, हा रुग्णालयांचे अधिष्ठाता किंवा डॉक्टरांचा दोष नाही, यासंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी ठाकरे यांनी यावेळी केली.

****

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात आज दुपारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचं निवडणूक चिन्ह मिळावं आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

****

शाश्वत कृषी आणि सामूहिक पर्यटनवाढीच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न करणं गरजेचं असून, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्य करत आहे, नागरिकांनीही यासाठी सहभाग नोंदवावा, असं आवाहन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल यांनी केलं आहे. मुंबईत काल महामंडळाने आयोजित केलेल्या, पर्यटन आणि हरित गुंतवणूक या विषयावरच्या वेबिनारमध्ये ते बोलत होते. राज्यात चार हजार कृषी पर्यटन केंद्र असून, एमटीडीसी पर्यटन विकासासाठी त्यांना संपूर्ण सहकार्य करत असल्याचं जयस्वाल यांनी सांगितलं.

****

निवासी आश्रमशाळांना जाहीर केलेलं २० टक्के अनुदान तत्काळ देण्याच्या मागणीसाठी आज धाराशिव मध्ये सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्गावर आळणी चौक इथं संस्थाचालक, शिक्षकांनी रस्ता रोको आंदोलन सुरु केलं आहे. या

आंदोलनात बीड जिल्ह्यातले शिक्षक, संस्थाचालक मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत.

****

चीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेत भारतानं आज दोन कांस्य पदकांची कमाई केली. तिरंदाजीत महिलांच्या संघानं रिकर्व्ह प्रकारात कांस्य पदक जिंकलं. अंकिता भाकत, सिमरनजित आणि भजन कौर यांच्या चमूनं व्हियेतनाम संघाचा पराभव केला. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉयनं कांस्य पदक मिळवलं.
क्रिकेट मध्ये आज भारतीय पुरुष संघाने बांगलादेश चा नऊ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करत बांगलादेशनं निर्धारित २० षटकांत नऊ बाद ९६ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल भारतीय संघाने दहाव्या षटकात हे लक्ष्य साध्य केलं.

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज पाकिस्तान आणि नेदरलँड्स संघात सामना होणार आहे. हैदराबाद इथल्या राजीव गांधी क्रिकेट मैदानावर दुपारी दोन वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****